Exh. 19/D

रे.क.नं. २० /२०२०

# मे. सिव्हील जज्जसो, ज्युनिअर डिव्हीजन, कळे-खेरीवडे यांचे कोर्टात...

१. अ) श्री.मारुती धोंडी नाईक - वादी

विरूध्द

१. अ) श्री.नामदेव पांडूरंग नाईक - प्रतिवादी

**<u>यातील वादी तर्फे विनंती अर्ज की,</u>**

१. प्रस्तुतचा दावा यातील वादी यांनी प्रतिवादींचे विरुध्द दावा मिळकत गट नं. २७६ चे सरस-निरस मानाने वाटप होवून मिळणेकरीता, कायम मनाईसाठी व हक्कज्ञापना-साठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत कामी यातील प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना सदर दावेच्या नोटीसा यातील प्रतिवादींना लागू झाल्या असून प्रतिवादी सदर हजर होवून त्यांनी आपली कैफियत व म्हणणे दाखल केले आहे.

O

Issue notice to the defendants.
Khuape
CJJD
01/10/2020

३. प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी नं. १ अ याने दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे बांधकाम करणेसाठी पाया खुदाई करुन त्यामध्ये बांधकामासाठी कॉलम उभे करणेस सुरुवात केली आहे.

सदर दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलार्जित मिळकत आहे. दावा मिळकत ही मुळची इनाम खुतातील भोगवटा वर्ग-२ नियंत्रित अविभाज्य सत्ता प्रकारमधील मिळकत आहे. व ती वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदारास गाव सनदी

884056 30/9/2020
Assistant Superintendent

## Order

Perused application and say. Heard both sides. Both parties are directed to maintain status quo in respect of the suit property till next date.

Kswecpe
CJJD

20/01/2022

इनाम म्हणून दिली आहे. याबाबत प्रतिवादींनी आपले कैफियत व म्हणणेमध्ये कथन केले आहे. तसेच दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकावरील इतर हक्कांमध्ये सक्षम प्राधिकारी पूर्व परवानगी शिवाय हस्तांरणास बंदी असा शेरा आहे. याप्रमाणे सत्य वस्तुस्थिती असतानादेखिल तसेच सदरचा दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी नं. १ अ हा दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे दावा मिळकतीत पाया खुदाई करुन त्यामध्ये कॉलम उभे करण्यास सुरुवात केली आहे.

४. दावा मिळकत ही शेत मिळकत आहे. व ती शासनाने वादी व प्रतिवादींचे पूर्वहक्कदारांना कसून खाणेसाठी दिलेली आहे. यातील प्रतिवादी नं. २ अ व ब यांनी मे. तहसिलदारसो, पन्हाळा यांचेकडून आपलेकरीता भोगवटा वर्ग १ करुन घेतली आहे. मा.तहसिलदारसो, पन्हाळा यांनी दावा मिळकत प्रतिवादी नं. २ अ व ब यांचे करीता १ते ५अटी नमुद करुन शेती कारणासाठी तसेच पूर्वपरवानगीखेरीज हस्तांतर - णास बंदी तसेच बिगरशेतीकामी पूर्वपरवानगी आवश्यक असे आदेशात नमुद आहे.

वरील प्रमाणे सत्य वस्तुस्थिती असताना यातील प्रतिवादी नं. १ अ हा दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे बांधकाम करणेस सुरुवात केली आहे. सदर बांधकामासाठी प्रतिवादी नं. १ अ याने ग्रामपंचायत अधिनियम कलम ५२ नुसार बांधकाम परवाना घेतलेला नाही. तसेच दावा मिळकत ही मुळची सरकार हक्कातील असल्याने सदर बांधकामासाठी प्रतिवादी सदर यांनी शासनाची पूर्व परवानगी घेतलेली नाही. तसेच अन्य प्रतिवादी दावा मिळकत विक्री करणेच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे दावा मिळकत विक्री झालेस दावेत गुंतागुंतता निर्माण होवून त्रयस्थ इसमाचा हक्क प्रस्थापित होणार आहे. त्यामुळे दावेत गुंतागुंतता व क्लिष्ठता टाळणेसाठी प्रतिवादींचे

30/9/2020

Assistant Superintendent

विरुध्द दावा मिळकत विक्री करु नये, त्यावर बोजा निर्माण करु नये, अन्य मार्गाने दावा मिळकत तबदील करुन त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करु नये याबाबत स्टेटस्कोचा आदेश होणे जरुरीचे आहे.

५. सदरचा अर्ज मंजुर होणे कायदयाचे दृष्टीने आवश्यक व वादीचे हिताचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. सदरचा अर्ज नामंजुर झालेस वादींचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. उलटपक्षी सदरचा अर्ज मंजुर झालेस प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत यावा.

**६. सबब, वादींची मे.कोर्टास नम्र विनंती की,**

अ) वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत यावा.

ब) प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये, दावा मिळकत विक्री करु नये, त्यावर बोजा निर्माण करु नये अथवा दावा मिळकतीवर त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करु नये असा प्रतिवादींचे विरुध्द स्टेटस्कोचा आदेश करणेत यावा, ही नम्र विनंती.

क) जरुरतर अर्ज दुरुस्तीस परवानगी असावी.

ड) अन्यते न्यायहूकूम याचकामी वादींचे वतीने व्हावेत.

येणेप्रमाणे अर्ज असे.

कळे-खेरीवडे.

ता. ३०/०९/२०२०.

मे.जा.व्हावे.

(वादी नं. ३ ब)

Assistant Superintendent 30/9/2020

## ऑफिडेव्हीट

मी वादी क्र. ३ ब) श्री. शहाजी कृष्णा नाईक, व.व.४०, धंदा :-शेती, रा. कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर अशी सत्य प्रतिज्ञेवर ऑफिडेव्हीट करतो की, वरील अर्जातील सर्व मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ऑफिडेव्हीट असे आज मुक्काम कळे-खेरीवडे.

ता. ३०/०९/२०२०

I know the signatory.
B S Patil
B.S. Patil-Gharpankar (Adv).

(वादी क्र. ३ ब)

## प्रतिज्ञा

मी वादी क्र. ३ ब) सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील दावा अर्जातील व अर्जाधील सर्व मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली असे सत्य प्रतिज्ञा आज मुक्काम कळे - खेरीवडे.




ता. ३०/०९/२०२०

(वादी क्र. ३ ब)

Solemnly Affirmed before me by
Shri Shahaji Krushna Naik age 40
of Kale, Tal Panhala who is
identified by Shri B.S. Patil-Gharpankar
Adv whom I know personally
Dated :-
30/9/2020

Assistant Superintendent